जाहीरांत विभाग
दिनांक / /२०२२

प्रेषक :- मा.आयुक्त सो,

प्रति :- नगरसचिव विभाग

विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, कार्यक्षेत्रांत महानगर पालिकेच्या मालकी जागेवर होर्डीग्ज (आकाशचिन्ह)युनिपोल व कि - ऑक्स या वर जाहिरांत करुन परीसराचे सुशोभिकरण करणे,निगा व देखभाल दुरुस्ती यासाठी ०५ वर्षे कालावधी साठी खाजगी सार्वजनिक सहभाग EXPRESSION OF INTEREST या तत्वावर जाहिरांतीचे हक्क प्रदान करणे करीता ई-निविदा मागविणे बाबत.

प्रस्तावना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २४४,२४५,३८६,३९२ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ व **मा.महासभा मंजुर ठराव क्र.०५ दिनांक** २४/०७/२०१७ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक जागेत महानगरपालिकेच्या रस्त्यालगत जनतेला दृष्टीगोचर असेल अशा जाहिरांत योग्य ठिकाणांवर होर्डीग (आकाशचिन्ह) मोजमाप १० X २० चे एकुण ४७ नग,१३५०० चौ.फु.क्षेत्रफळा करीता व युनिपोल १०X २० चे एकुण २० नगा करीता ४००० चौ.फु.क्षेत्रफळाकारीता एकुण रु.२२,९३,२००/- मात्र व शहरातील सर्व उडडाणपुला वरील विदयुत खांबावरील कि-ऑक्स एकुण ८१२ नगा करीता एकुण १९४८८ चौ.फु.क्षेत्रफळा करीता रु. १,३०,७८,९००/-मात्र असे एकुण रु.१,५३,७२,१००/- मात्र होत आहे.भिवंडी नि.श.महानगरपालिकेने दिनांक १४/०८/२०१७ ते दिनांक १०/०६/२०२१पर्यत एकुण २२ वेळा निविदा प्रसिध्द करुन निविदाकारांनी निविदेस प्रतिसाद दिला नाही.

**मा.महासभा ठराव क्र.०५ दिनांक २४/०७/२०१७** च्या मंजुर दरानुसार प्रतिवर्षी १०% वाढ करुन निविदा काढणेस मंजुरी दिलेली होती. त्यानुसार मात्र किमान ५० % वाढ अपेक्षित आहे. दरवर्षी १० टक्के नैसगिक वाढ धरुन पुढील रक्कम होत आहे.

सन २०१७-१८ एकुण रु.१,५३,७२,१००/-व अधिक १० % रु १,६९,०९३१०/-
सन २०१८-१९ एकुण रु.१,६९,०,९३१०/- व अधिक १०% रु १,८६,००२४१/-
सन २०१९-२० एकुण रु.१,८६,००,२४१/- व अधिक १०% रु २,०४६,०,२६५/-
सन २०२०-२१ एकुण रु.२,०४६,०,२६५/- व अधिक १०% रु २,२५,०,६२९१/-
सन २०२१-२२ एकुण रु. २,२५,०,६२९१/- व अधिक१०% रु २,४७,५६,९२०/-मात्र

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०९ मे २०२२ च्या नविन अध्यादेशा नुसार महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम (१९४९ चा ५९) यांची कलमे २४४ व २४५ आणि कलम ४५६ अ चे पोट कलम (१) याव्दारे अवश्यक असल्याप्रमाणे पुर्व प्रसिध्दीनंतर आणि महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन त्याबाबत महाराष्ट्र शासनाने आणि महानगरपालिकांनी प्रसिध्द केलेले मुंबई प्रातिक महानगरपालिका, (जाहीरांत व फलक नियंत्रण) नियम २००३ आणि इतर सर्व नियम आदेश संलेख यांचे अधिक्रमण करुन महानगरपालिका क्षेत्रांतील आकाशचिन्हे आणि जाहीरातं प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण नियमावली २०२२ नुसार जाहिरांतीसाठी जागा निश्चित करुन महानगरपालिकेची आधारभुत किंमत रु.२,४७,५६,९२०/- मात्र.पुढील ५ वर्षासाठी प्रत्येक वर्षी **१०%** भाडेवाढ तसेच दरवर्षी मंजुर असणा-या दरानुसार वाढणारे ठिकाणांना प्रस्तावित दरा नुसार वाढीव आकारणीसहीत खाजगी नोंदणीकृत जाहिरात ठेकेदार यांचे कडुन **"स्वारस्य देकार"** (**EXPRESSION OF INTEREST**) ई-निविदा नुसार स्पर्धात्मक दर मागवुन जाहिरात प्रसिध्द करणे करीता जाहिरांतीचे हक्क भाडयाने देणे कामी प्रस्ताव सादर केला असुन त्यांस **मा.प्रशासकीय मान्यता मिळणे कामी विनंती** आहे.

(दिपक झिंजाड)
उप-आयुक्त (जाहिरांत)
भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, कार्यक्षेत्रांत महानगर पालिकेच्या मालकी जागेवर होर्डींग्ज (आकाशचिन्ह) युनिपोल व कि - ऑक्स या वर जाहिरांत करुन परीसराचे सुशोभिकरण करणे,निगा व देखभाल दुरुस्ती यासाठी ०५ वर्षे कालावधी साठी खाजगी सार्वजनिक सहभाग EXPRESSION OF INTEREST या तत्वावर जाहिरांतीचे हक्क प्रदान करणे करीता ई-निविदा मागविणे बाबत कार्यालयीन टिप्पणी विचारांत घेऊन ९ मे २०२२ रोजी **महाराष्ट्र शासनाने केलेल्या अधिसुचनेतील अटी / शर्ती यांना अधिन राहुन सदर कामी "स्वारस्य देकार" (EXPRESSION OF INTEREST)** नुसार ई- निविदा मागविणेस मान्यता देण्यांत येत आहेत.

(विजय कुमार म्हसाळ)
आयुक्त तथा प्रशासक
भिवंडी नि.श.महानगरपालिका,भिवंडी

मा.प्रशासकीय ठराव क्र. ३०

दिनांक २५/ ९ /२०२२